अग्रलेखांचा बादशहा नवा काळ

संस्थापक : नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

नवा काळ

।। न मे भक्त: प्रणश्यति ।।

अग्रलेखांचा बादशहा नवा काळ

# आता या पुढे 'टोल'वा 'टोल'वी चालणार नाही

राज्यात रस्ते विकासाचा कार्यक्रम राबवताना नेम का कोणाचा विचार केला गेला असा महत्त्वाचा प्रश्न आता निर्माण होतो. सामान्य जनतेला डोळ्यापुढे ठेवून जर रस्ते विकासाचे धोरण राबवले गेले असते. तर त्यासाठी ठिकठिकाणी उभारले गेलेल्या टोलनाक्यांवर जाळपोळ करण्याची वेळ आली नसती. आता तर निवडणूक डोळ्यासमोर ठेवून राज्यातील सर्व टोलनाके बंद करण्याचा किंवा टोलवसुली हा प्रकारच नाहीसा करण्याच्या हालचाली सुरू झाल्या आहेत. राज्याच्या अनेक भागामध्ये रस्त्यांची दुर्दशा असूनही टोलवसुलीचे प्रकार चालतात. किलोमीटर किंवा दोन तीन किलोमीटरचे रस्ते ठाकठीक असतात बाकी अन्य रस्ते खड्ड्यांनीच व्यापलेले असताना देखील एका वाहनांमागे तीस-चाळीस रुपयाचा टोल वसूल केला जातो. खरे सांगायचे तर ज्या कारणांसाठी टोल प्रकार सुरू झाला त्यात वेगळेच अर्थकारण आणि राजकारण असल्याचे आता सिध्द झाले आहे. या टोलप्रकाराची सुरुवात पुणे-मुंबई द्रुतगती मार्गावर झाली. या रस्त्यांचे बांधकाम अवाढव्य होते. आणि त्याचा खर्च भरून काढण्यासाठी लोकांकडून टोल वसूल करण्याची कल्पना पुढे आली. परंतु त्याचवेळी हा खर्च भरून निघाला की टोलवसुली थांबवण्यात येईल अशा प्रकारची तरतूद केली गेली होती. पुणे-मुंबई रस्त्यासाठी लागणारा खर्च पाच वर्षांपूर्वीच वसूल झाला आहे आणि आता त्या रस्त्यावर वसूल होणारा टोल कंत्राटदाराचे आणि राजकारण्यांचे खिसे भरण्यासाठी वापरला जातो हे लपून राहिलेले नाही. म्हणूनच या टोलविरोधात आता लोकांमध्ये संतप्त भावना निर्माण होत आहेत. मनमानी पध्दतीने होणारी ही टोलवसुली खरे तर थांबवली गेली पाहिजे. किंवा त्यामध्ये योग्य तो बदल करून लोकांना दिलासा दिला गेला पाहिजे.आता हा योग्य तो बदल म्हणजे ज्या रस्त्यांचा खर्च वसूल झाला आहे. तिथून टोल काढून टाकावा आणि अन्य रस्त्यांवरदेखील तो विशिष्ट कालावधीसाठी वसूल केला जाईल, असे जाहीरपणे प्रदर्शित केले जावे. लोकांना गरज आहे म्हणून ते टोल देऊन मोकळे होतात. याचा अर्थ त्यांनी तो गुलामाप्रमाणे भरतच राहिला पाहिजे, असे समजण्याचे काहीच कारण नाही. सरकारने आता टोलबाबत योग्य तो निर्णय घ्यावा. याबाबत टाळाटाळ केली तर लोकच सरकारचे टाळके फोडल्याशिवाय राहणार नाही आणि टोलबाबत चालणारी राजकीय टोलवाटोलवी कोणत्याच पक्षाला परवडणार नाही.

### निषेधाचा कोल्हापुरी पॅटर्न

राज्याचे आर्थिक धोरण कसे राजकीय अंगाने घडवले जाते याचे उत्तम उदाहरण म्हणून या टोलप्रकाराकडे पाहिले जाते. आश्चर्याचा भाग एवढाच आहे की टोलमागे कोणतेही पारदर्शी अर्थकारण नाही. तरीही सरकार आपल्याच सग्यासोयऱ्यांना सांभाळण्याकरता टोल नावाचा 'जिझिया कर' लोकांकडून वसूल करत राहिले. आता त्याविरुध्द उद्रेक निर्माण झाला त्यावेळेला सरकारला थोडीफार जाग आली. अगदी पुणे-मुंबई किंवा मुंबई नाशिक अशा दोन महामार्गांवरची उदाहरणे जरी घेतली तरी या दोन्ही शहरांमध्ये पोहचेपर्यंत किमान दोनएकशे रुपयाचा भुर्दंड वाहनचालकाला बसत असतो. भुर्दंड भरणाऱ्या व्यक्तीची ती ऐपत जरी असली तरी हा गोळा होणारा पैसा जसाच्या तसा किंवा त्यातला नव्वद टक्के पैसासुध्दा रस्त्यांच्या देखभालीसाठी वापरला जात नाही. आज राज्यातल्या रस्ते बांधणी प्रकाराच्या कंत्राटाचे आणि टोलवसुलीसाठी वापरल्या जाणाऱ्या ठेकेदार पध्दतीचे महालेखापालांकडून ऑडिट केले तर कोळसा खाणीतल्या भ्रष्टाचाराप्रमाणे म्हणजेच कोलगेटप्रमाणे राज्यातील टोलगेट प्रकरणाचे भांडे फुटल्याशिवाय राहणार नाही कारण रस्ते बांधणीचे कंत्राट ज्या कंपन्याना दिले जाते. त्यामध्ये ठराविक व्यक्तींच्या कंपन्या वेगवेगळ्या नावाने कंत्राट घेतात आणि त्यातच टोलवसुलीचा अधिकार स्वत:कडे ठेवतात. सर्वात महत्त्वाचे म्हणजे रस्तेबांधणी किंवा टोलवसुली करणाऱ्या कंत्राटदारांबरोबर पन्नास टक्के भागीदारी असल्याचे आढळून येईल. अगदी सेना भाजपा युतीच्या काळातसुध्दा असेच भागीदारीचे राजकारण आणि अर्थकारण खेळले गेले. कोणताही गाजावाजा न करता अनेक राजकारण्यांना टोलवसुलीतला हिस्सा घरपोच पाठवला जातो. म्हणूनच या टोलप्रकरणातले अर्थकारण आणि राजकारण उघड झाले पाहिजे. त्यामध्ये संगनमतानेच व्यवहार चालत असल्यामुळे आतापर्यंत कोणताच राजकीय पक्ष ठोस भूमिका घेत नव्हता. आता टोलविरोधातल्या कोल्हापुरी पॅटर्नने या टोलमाफियांविरुध्द अशी काही कोल्हापुरी चप्पल उगारली आहे की, त्याच्या लबाडीला आपोआप लगाम बसू शकेल.

### टोल जाईल भैरवांचे काय

सेना भाजपा युतीच्या नेत्यांनी तर थेट टोलप्रकरण रद्द करण्याची घोषणा केली आहे. महायुतीची सत्ता आली तर राज्याला टोलमुक्त करू असे या युतीच्या नेत्यांनी जाहीर केले आहे. कदाचित त्यांच्या या घोषणेचा अंदाज घेऊन सध्याचे सरकारच जागे होऊ शकते आणि राज्याच्या अनेक भागांना टोलमुक्त करू शकते. परंतु टोल नाहीसा झाला तरी मागे असलेले भैरव आपला गैरकारभार चालूच ठेवतील. त्यामुळे टोल जाईल पण त्या भैरवांचे काय हा प्रश्न कायम राहतो. कारण टोलमुक्त करणे वाटते तितके सोपे नाही. कारण आज ते सरकारचे नाही पण सत्ताधारी मंडळींचे उत्पन्नाचे फार मोठे साधन झाले आहे. ही टोलवसुली थांबवताना सरकारला दहा वेळा विचार करावा लागेल. काही प्रमाणात महापालिकांच्या उत्पन्नावर परिणाम होईल. मात्र कंत्राटदारांचे हितसबंध कायमचे दुखावले जाण्याची शक्यता आहे. आज तरी ते सत्ताधाऱ्यांना परवडणारे नाही. मात्र आज ना उद्या या टोलप्रकरणाचा गांभीर्याने विचार करावा लागेल. सामान्य जनतेला दिलासा द्यावा लागेल. ठाण्यातून मुंबईत येण्यासाठी जर दोन किलोमीटरकरीता तीस चाळीस रुपये टोल द्यावा लागत असेल तर तो सरळसरळ अन्याय ठरतो. लोकांच्या खिशातून जबरदस्तीने पैसे काढून घेण्याचा जुलमी प्रकारच ठरतो. नेहमीच राजकीय अंगाने विचार करुन चालणार नाही. आता तसे दिवसही राहिलेले नाहीत. सामान्य जनतेच्या हिताचा विचार असेल आणि तशी धोरणे राबवणाऱ्यांनाच जनता साथ देणार आहे. ही बदलती राजकीय परिस्थिती लक्षात घेऊन महाराष्ट्रातही विचार करावा लागेल. वीज दरातील सवलतींपासून ते टोलवसुलीच्या मुक्तीपर्यंत अशा अनेक मुद्द्यांबाबत सरकारला तातडीने निर्णय घ्यावे लागतील.